**<u>वादींतर्फे साक्षीदार क्र.१ ची सरतपासणी शपथेवर पुन्हा सुरु</u>** -

६. मी, प्रताप साबाजी कानडे, वय ५० वर्षे, धंदा - नोकरी, रा. हिर्लोक, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, सत्यप्रतिज्ञेवर सांगतो की, सदरचे पुरावा प्रतिज्ञापत्र मी दाखल केलेले आहे. त्यातील मजकूर माझे सांगणेप्रमाणेच लिहीलेला आहे. तो खरा व बरोबर आहे. त्यासाठी मी त्यावर सही केलेली आहे.

७. वादीने दाखल केलेल्या दस्तऐवजांपैकी सार्वजनिक दस्तऐवजांना पूर्वीच निशाणी देण्यात आलेल्या आहेत. उर्वरीत दस्तऐवज म्हणजेच अखत्यारपत्रास **<u>निशाणी ३२४</u>** देण्यात आली.

**<u>प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे उलटतपास श्री. एन्. एम्. वैद्य, वकील</u>** -

८. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकती प्रतिवादी कुटुंबियांच्या वाडवडिलार्जित सामाईक मिळकती आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी कुटुंबाचा आणि आमचा कोणताही नातेसंबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी कुटुंबाच्या वाडवडिलार्जित सामाईक मिळकतींमध्ये आमचा वारस म्हणून कोणताही हक्कसंबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी कुटुंबाचे आम्ही वारस म्हणून कोण लागतो, हे दर्शविणारी कोणतीही वंशावळ आम्ही दाव्यात दिलेली नाही.

९. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींनी दावा मिळकतींसंबंधी याच न्यायालयात रे.मु.नं. १३/१९७५ हा दावा ताकिदीसाठी दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या मिळकतीसंबंधी जिल्हा न्यायालयात जे अपिल झाले होते त्या निणर्या विरुध्दचे अपिल आजही मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. त्या दाव्यात नमूद सर्व मिळकती प्रस्तुत दाव्यात समाविष्ट आहेत. हे म्हणणे खरे नाही की, तो दावा निकाली झाल्यावर प्रस्तुत दावा दाखल करणेत आला. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीत द्रौपदी औरत येसू गोपाळ कानडे यांचा १/३ हिस्सा होता, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन १८६५ साली द्रौपदी ही विधवा असल्यामुळे तिला दावा मिळकतींमध्ये कोणताही हिस्सा मिळणारा नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे दाव्यात नमूद दि. ०७ जानेवारी १८६५ रोजीचे गहाणखत बेकायदेशिर आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे त्या गहाणखतानुसार आमचे म्हणणे की, दावा मिळकतींचा कब्जा माळवा कुटुंबाकडे गेला, हे सुध्दा मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मूळ गहाणखत बेकायदेशिर असल्याने माळवा कुटुंबियांनी करुन दिलेले गहाणखत सुध्दा बेकायदेशिर आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन १८६५ साली करुन दिलेले गहाणखत फोरक्लोज करुन मिळावे असा दावा आणलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, तसा दावा माळवा कुटुंबियांनी आणला होता, हे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा माझेकडे नाही.

**१०.** हे म्हणणे खरे नाही की, भिवा साबाजी कानडे याने सुध्दा सन १९०२ चे गहाणखत फोरक्लोज करुन मिळावे म्हणून दावा आणला होता, हे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा मी सदरकामी हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे द्रौपदी हिचा १/३ हिस्सा आमचेकडे आला हे आमचे म्हणणे मूळातच चूकीचे व बेकायदेशिर आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा परिशिष्ट 'ब' पैकी अ.क्र. ७ ते ११ व १५ ते २० , या मिळकतींचा कब्जाभोग्य कधीही आमच्याकडे नव्हता, तसेच अ.क्र. १२ च्या मिळकतीत सुध्दा दावा चालू असताना आमचे घर नव्हते. दाव्याचे कामकाज सुरु असताना आम्ही घर बांधणेस सुरुवात केली असताना प्रतिवादींच्या अर्जावर न्यायालयाने ते घर बांधू नये असा मनाई हुकूम दिला होता, हे मला आता आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या मिळकतींसंबंधीच्या दाव्याचा निकाल आमचे विरुध्द गेल्यास आम्ही स्वखर्चाने ते बांधकाम काढून घेवू, असे न्यायालयात लिहून दिले होते.

**११.** हे म्हणणे खरे नाही की, त्या घराभोवतीच्या दोन एकर मिळकतीत माझा कब्जाभोग्य आहे, हे माझे म्हणणे खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतींपैकी अ.क्र. १३ चे मिळकतीत सुध्दा एक मांगर होता व तो आता पडला, हे माझे म्हणणे खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, रे.मु.नं. १३/१९७५ मध्ये या न्यायालयाने दिलेल्या आदेशा विरुध्द आम्ही अपिल करुन स्थगिती मिळविली व बळजबरीने तेथे घर व मांगराचे बांधकाम केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतींपैकी अ. क्र. १४ पैकी नदीकिनारची १० गुंठे जमीन आमच्या ताब्यात आहे, हे माझे म्हणणे सुध्दा खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी आम्ही ग्रामपंचायतीची परवानगी न घेता जबरदस्तीने पंपशेड बांधलेले आहे. त्या पंपशेडला विद्युत पुरवठा करु नये असा अर्ज प्रतिवादींनी केला होता किंवा कसे, हे आता मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा परिशिष्ट 'ब' मिळकतींमध्ये आमची वहिवाट व मौल्यवान झाडे आहेत, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या मिळकतीमधील प्रतिवादींनी कोणतीही झाडे तोडलेली नाहीत.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीं विरुध्द आम्ही खोटा व खोडसाळ दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे पुरावा प्रतिज्ञापत्र दाखल करुन आज खोटी साक्ष देत आहे.

**<u>प्रतिवादी क्र. ४ ते १० व त्यांचे वकील गैरहजर</u>** - त्यांचेतर्फे उलटतपास नाही.

*( कोर्टाची वेळ संपल्याने प्रकरण प्रतिवादी क्र. ११ ते १७ तर्फे उलटतपासासाठी पुढील तारखेपर्यंत तहकुब. )*

**समक्ष -**

सही/-
**(कोमलसिंग राजपूत)**
**दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**

**कुडाळ**
**दिनांक : १६ /०१ /२०१८**

वा.दा.ब.अ.क.केले.

सही/-
**(कोमलसिंग राजपूत)**
**दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**

**कुडाळ**
**दिनांक : १६ /०१ /२०१८**

**<u>साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सुरु</u> -**

**<u>प्रतिवादी क्र. ११ ते १७ तर्फे उलटतपास श्री. एम्. डी. कुंटे, वकील</u> -**

**१३.** दावा मिळकतींबाबतचे मूळ गहाणखत व इतर मूळ दस्तऐवज अजूनही आस्तित्वात आहेत. मी ते एकदा उच्च न्यायालय, मुंबई, येथून आणले सुध्दा होते. हे म्हणणे खरे नाही की, सर्व्हे नंबर १४७/४+५+६+७+८+९ , या मिळकतीचे एकूण क्षेत्र ०७.५०.०० हे.आर. एवढे आहे. त्या मिळकतीचे क्षेत्र २२ एकर आहे. *साक्षीदार नंतर सांगतो की, त्या मिळकतीचे क्षेत्र ८ एकर ८० गुंठे आहे.* हे म्हणणे खरे नाही की, त्या मिळकतीपैकी ०६.२०.०० हे.आर. क्षेत्रावर प्रतिवादी नंबर ११ ते १७ कृषक दिनापूर्वीपासूनचे कूळ आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी नंबर ११ ते १७ यांना तहसिलदार, कुडाळ, यांनी टेनन्सी केस नंबर ०८/२००० मधील आदेशानुसार कूळ म्हणून घोषित केलेले आहे. प्रतिवादी नंबर ११ ते १७ यांची नांवे आज रोजी दावा मिळकतीच्या ७/१२ उता-यावर दाखल आहेत.

**१४.** हे म्हणणे खरे नाही की, प्रत्येक प्रतिवादीची त्यांच्या-त्यांच्या क्षेत्रात कब्जाभोग्य, कसवट, वहिवाट आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या मिळकतीत प्रतिवादी क्र. १३ याचे हिर्लोक ग्रामपंचायत हद्दीतील घर क्रमांक ३६१ आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीपैकी अ.क्र. १४ च्या मिळकतीत पूर्वी फक्त प्रतिवादी नंबर १ ते ३ यांचाच केवळ मालक या नात्याने हक्कसंबंध होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या मिळकतीशी आमचा व प्रतिवादी नंबर ४ ते १० यांचा कोणताही हक्कसंबंध नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी नंबर ११ ते १७ यांनी त्या मिळकतीत विविध फळझाडे, फुलझाडे लावली व तिला संरक्षक तारेचे कुंपण केले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मला त्यांनी धमक्या देण्याचा संबंध येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमचा कोणत्याही दावा मिळकतीशी कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही खोटा दावा दाखल करुन मी खोटे पुरावा प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे व आज खोटी साक्ष देत आहे.

**<u>फेरतपास</u>** - नाही.

**समक्ष -**

सही/-
**(कोमलसिंग राजपूत)**
**दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**

**कुडाळ**
**दिनांक : १९ /०१ /२०१८**

वा.दा.ब.अ.क.केले.

सही/-

**(कोमलसिंग राजपूत)**

**दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**

**कुडाळ**

**दिनांक : १९ /०१ /२०१८**